## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०४/२०१८

**१) रेती चोरून वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक १९/०४/२०१८ चे २३.४५ वा. ते २०/०४/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे पो.स्टे. परीसरात पेट्रोलींग दरम्यान आरोपी ट्रॅक्टर चालक हा त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर मध्ये १ ब्रास रेती कि. १,०००/रु. ची चुलबंद नदीचे पात्रातुन भागडी येथुन चोरून वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. मुंजमकर रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. मुंजमकर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगी मिळुन न आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०४/२०१८ चे १०.४५ ते १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरासमोर खेळत असता, काही वेळाने ती मिळुन न आल्याने तीचा फिर्यादीने मुलीच्या नातेवाईकाच्या मदतीने आजुबाजुला शोध घेतले असता,मिळुन न आल्याने, फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कारंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) अज्ञात जिप चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोघांचा मृत्यु :–**

दिनांक १९/०४/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा पत्नी सौ. सुनिता झोडे वय ३५ वर्ष हीचे सोबत कासंबी येथुन लग्न सोहळयाचे कार्यक्रम आटोपुन स्वत:चे मोटार सायकल क्र. एमएच ३६ डब्लु ६४०३ ने स्वत:चे गावी जात असतांना समोरुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील जिप भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला कट मारुन फिर्यादी व फिर्यादीचे पत्नी सौ. सुनिता हीचे मरणास कारणीभुत होवुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यशवंत बळीराम झोडे वय ४५ वर्ष, रा. शिवनीबांध यांचे तोंडी व डॉ. मेमो, एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. रेवतकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०४/२०१८ चे १६.२० ते १७.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल वाहन ही द्रेव्हाळी टिपॉईट येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. सरोदे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**५) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २०/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, सिहेरा, साकोली व पवनी येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ३४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६८४ लिटर हातभंट्टी दारू + ४६१५ किलो सडवा मोहा+ साहित्य+१ मोटार सायकल किंमती ३३,०५४०/रु. व १४ लिटर ९१० मिली लिटर देशी दारु किंमती ४,४५८/–रु. तसेच जुगारातुन ५६,१८२/रु. असा एकुण किंमती ३,९१,१८०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २०/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ४५६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– १२, तीन सिटर वाहनाकरीता– ६८ ईतर वाहनांवरती – ३७६ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.